# नियामक मंडळाची ३८ वी बैठक दिनांक २८ जानेवारी २००४

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३८ वी बैठक दि. २८.१.२००४ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. ३८/१

''ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ३७ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. ३८/२

''ठराव करण्यात येतो की,

१. सन २००२-२००३ या आर्थिक वर्षाच्या रु. १४९९८ कोटींचा ताळेबंद, स्वीकृत करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.
२. सन २००२-२००३ च्या नफा तोटा लेखा, स्वीकृत करण्यास महामंडळाची मान्यता देण्यात येत आहे.
३. वित्तीय वर्ष २००१-२००२ या कालावधीतील अंतर्गत लेखा परिक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालनास मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३८/३

''ठराव करण्यात येतो की, उद्दिष्टपूर्तीसाठी आखलेला कार्यक्रम पूर्ण करण्याचे अनुषंगाने सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या रु. ३५९८ कोटींच्या अर्थसंकल्पास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३८/४

''ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाकडील प्रकल्पांची कामे, भूसंपादन पुनर्वसन अदायगी, इतर विभागाची देणी, आस्थापनेची प्रलंबित देणी या सर्व दायित्वांसाठीची आवश्यक तरतूद शासनाने महामंडळास तातडीने उपलब्ध करुन द्यावी.
२. महामंडळाने शासनास देय असलेले शासन हमी शुल्क शासनाकडून माफ करण्यात यावे.

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

३. महामंडळाकडील इतर वित्तीय संस्था/महामंडळे/बँका या सर्वांची देणी निभावण्यासाठी शासनास वेळोवेळी महामंडळाने सादर केल्याप्रमाणेचे आवश्यक अनुदान तातडीने शासनाने महामंडळास उपलब्ध करुन द्यावे.

४. सर्व प्रथम प्राधान्याने विविध न्यायालयीन प्रकरणी शासनाचा/महामंडळाचा होणारा संभाव्य अवमान टाळण्यासाठी महामंडळाकडील प्रकल्पांच्या बाबतीतील व अन्य बाबतीतील न्यायालयीन प्रकरणांच्या निवाड्यानुसार अदायगीसाठी आवश्यक असलेला निधी भारित खर्च म्हणून अत्यंत तातडीने शासनाकडून महामंडळास उपलब्ध करुन देण्यात यावा.''

ठराव क्र. ३८/५

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम क्र.१५/४.४.९६ नुसार असलेले सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार पूर्ववत देण्याबाबतचा प्रस्ताव, शासन निर्णय क्र.४.१२.२००३ च्या अनुषंगाने शासनास सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. ३८/६

''ठराव करण्यात येतो की,

१. गौण खनिजावरील स्वामित्व शुल्काची तरतूद नव्याने करावयाच्या अंदाजपत्रकांमध्ये करण्यासाठी शासनास मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने लवकरात लवकर मान्यता द्यावी, अशी विनंती नियामक मंडळामार्फत करण्यात येत आहे.

२. वर नमूद केल्याप्रमाणेची शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत सद्य:स्थितीत महामंडळात प्राप्त होणाऱ्या निविदांच्या देकारांचे मूल्यमापन करताना, निविदेमध्ये आलेले स्वामित्व शुल्का पोटीचे अधिक्य वगळून, सदर निविदांचे मूल्यांकन करुन विहित नियमानुसार त्यांच्या स्विकृतीची कार्यवाही करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३८/७

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांद्वारे संकलित होणाऱ्या पाणीपट्टीच्या एकूण महसूलातून ३३ % रक्कम प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीच्या खर्चासाठी उपयोगात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. ही कार्यवाही शासनास अवगत करण्यात यावी.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ठराव क्र. ३८/८

''ठराव करण्यात येतो की,

१. कोल्हापूर जिल्ह्यातील को.प. बंधाऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या थकीत रु.८.३४ कोटी देयकांपैकी रु. ३ कोटीची देयके, महामंडळाच्या डिसेंबर ०३ अखेर जमा झालेल्या पाणीपट्टीच्या महसूलातून अदा करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सन २००३-०४ पासून कोल्हापूर जिल्ह्यातील को. प. बंधाऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रत्यक्ष पाणीपट्टी वसुलीच्या प्रमाणात निधी नियमितपणे उपलब्ध करुन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३८/९

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्राच्या अदायगीमधून वसुल केलेली ६५% रक्कम पुनर्वसनाच्या प्रलंबित रकमेच्या अदायगीसाठी वापरण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच या प्रमाणे करण्यात आलेली कार्यवाही शासनास अवगत करावी."

ठराव क्र. ३८/१०

"ठराव करण्यात येतो की,

१. नीरा देवधर पाटबंधारे प्रकल्पास ए.आय.बी.पी. अंतर्गत अर्थसहाय्य मिळण्याच्या दृष्टीने केंदीय जल आयोग/नियोजन आयोगाची मान्यता मिळविण्यासाठी केंद्रीय जल आयोगाच्या तांत्रिक सल्लागार समितीने सुचविल्याप्रमाणे ७५ टक्के विश्वासार्ह उपलब्ध जलसंपत्तीची सुधारित परिगणना करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील १ प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर त्या अभ्यासानुसार प्रकल्पाचे जलनियोजन सुधारित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्रमांक ३८/११

"ठराव करण्यात येतो की, घटप्रभा प्रकल्प, ता. चंदगड, जि. कोल्हापूर या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मौ. फाटकवाडी व मसुरे या दोना गावांच्या पुनर्वसनासाठी लाभक्षेत्राबाहेर देण्यात येणाऱ्या हेरे संरजाम सरकारी हक्कातील जमिनीचे सपाटीकरणाची कामे करण्यास व त्यासाठी कृषि खात्याने अंदाजित केलेल्या रु.७६.४१ लक्ष इतका खर्च करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ठराव क्र. ३८/१२

"ठराव करण्यात येतो की,

१. बोरी जलाशयामुळे हरणा व बोरी या नद्यांच्या मध्यभागी असलेल्या शेतजमिनींकडे जाण्यासाठी बोरी नदीवर पूल व रस्ता बांधण्याची कामे बोरी प्रकल्पांतर्गत समाविष्ट करण्यात यावीत.

२. वरील (१) मधील पूल व रस्त्याची कामे करण्यासाठी रु. १.१४ कोटींचे दायित्व निर्माण करण्यास व सदरची कामे हाती घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

३. पर्यायी रस्ता व पुलासाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद बोरी प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात करण्यात यावी."

ठराव क्र. ३८/१३

"ठराव करण्यात येतो की,

१. २००३-०४ मध्ये म्हैसाळ टप्पा-१ व टप्पा-२ चे आवश्यक पंप चालू करुन ७ आवर्तनांद्वारे अंदाजे ७५० हेक्टर क्षेत्रास (ऊस व द्राक्षे खालील) पाणी देण्याच्या नियोजनास प्रायोगिक तत्वावर व विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील (१) प्रमाणे पाणी देण्यासाठी रु. ३७५० प्रति हेक्टर प्रति आवर्तन या दराने आकारणी करण्यात यावी.

३. वरील (२) प्रमाणे वसूल झालेल्या रकमेतून २००३-०४ मध्ये म्हैसाळ टप्पा-१ व टप्पा-२ च्या चालू केलेल्या पंपाची वीजदेयके अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. वरील (२) प्रमाणे वसूल केलेल्या रकमेतून वरील (३) प्रमाणे झालेला खर्च वगळून उर्वरित रक्कम पाणीपट्टीच्या महसूलापोटी जमा करावी.

५. वरील कार्यपद्धती इतर शासकीय उपसा सिंचन योजनांसाठी वापरण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ३८/१४

"ठराव करण्यात येतो की,

१. भामा आसखेड प्रकल्प, जि. पुणे या प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून श्री क्षेत्र आळंदी, मौ. चऱ्होली, धानोरे व सोलू या गावांचे अंदाजे ८०० हेक्टर क्षेत्र वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील (१) प्रमाणे क्षेत्र वगळल्यामुळे वाचलेले पाणी खेड तालुक्यातील क्षेत्रासच देण्याचे नियोजन करण्यात यावे. वगळलेल्या गावातील पर्यायी क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही रद्द करण्याबाबत महसुल विभागास कळविण्यात यावे. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी पर्यायी जमीन संपादित करण्यासाठी स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात यावी."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ठराव क्र. ३८/१५

''ठराव करण्यात येतो की,

(१) वाकुर्डे उपसा सिंचन योजना शिराळा व कराड तालुक्यांसाठी सिमित करावी व या योजनेस वाकुर्डे उपसा सिंचन योजना टप्पा-१ म्हणून संबोधण्यात यावे.

(२) वाळवा तालुक्यातील वाकुर्डे उपसा सिंचन योजनेच्या क्षेत्रास सिंचन लाभ देण्यासाठी वाकुर्डे उपसा सिंचन योजना टप्पा-२ म्हणून स्वतंत्र उपसा सिंचन योजनेचे नियोजन करण्यात यावे.

(३) वाकुर्डे उपसा सिंचन योजना टप्पा-२ साठी वारणा प्रकल्पांतर्गत वारणा डावा कालवा किमी २७ ते ७० मधील रद्द केलेले कालव्याचे काम हाती घेण्यात यावे.

(४) वारणा प्रकल्पांतर्गत शासनाने १९९० मध्ये रद्द केलेल्या किमी १०० ते १३० मधील कृष्णा नदीकाठचे वारणा प्रकल्पाचे लाभक्षेत्रास पाणी देण्यासाठी वारणा-कृष्णा जोड कालव्याचे स्थगित केलेले काम हाती घेण्यात यावे.

(५) वाकुर्डे उपसा सिंचन योजनेची व्याप्ती वरील (१) प्रमाणे सिमित केल्याने, मंजूर प्रकल्प अहवालाप्रमाणे केलेल्या कामांपैकी रु.३.५० कोटींचा निष्फळ ठरणारा खर्च अपरिहार्य बाब म्हणून स्विकारण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३८/१६

''ठराव करण्यात येतो की, को.प. बंधारा निंबूत, ता. बारामती, जि. पुणे या प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर शासनाच्या नियोजन व वित्त विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता मान्य करण्यात येत आहे. त्यानुसार शेरेपूर्तता अहवाल शासनास सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. ३८/१७

''ठराव करण्यात येतो की, ताकारी उपसा सिंचन योजनेच्या किमी १ ते ४४ मधील वितरिका/पोटचाऱ्यांची कामे सोबतच्या परिशिष्ट क्र. १ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून विहीत करारनामा करुन साखर कारखाने वा इतर संस्था यांच्यामार्फत करुन घेण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३८/१८

''ठराव करण्यात येतो की, कोल्हापूर जिल्ह्यातील बोरीवडे व बोरपाडळे या लघु पाटबंधारे तलावांना असणारा स्थानिक लोकांचा तीव्र विरोध लक्षात घेऊन या योजना रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ठराव क्र. ३८/१९

''ठराव करण्यात येतो की,

१. कुकडी प्रकल्प वसाहत नारायणगांव येथील २ एकर जागा, महामंडळास आवश्यक नसल्याने शासनास (महसूल विभाग) हस्तांतरित करण्यात यावी.

२. वरील (१) प्रमाणे शासनास (महसूल विभाग) हस्तांतरित केलेली २ एकर जागा तमाशा कलावंताच्या मुलांमुलींच्या आश्रमशाळेसाठी देण्याबाबत महसुल विभागास कळविण्यांत यावे.''

आयत्या वेळचे विषय

ठराव क्र. ३८/२०

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यकक्षेतील प्रकल्पांसाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व शुल्क परताव्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात येत असून सदर कार्यवाही शासनास अवगत करण्यात यावी.

१. जुन्या व चालू असलेल्या निविदांतील कामांसाठी जेथे स्वामित्व शुल्काचा परतावा देण्याची तरतूद नाही अशा प्रकरणी गौण खनिजाच्या स्वामित्व शुल्काचा परतावा निविदेतील अतिरिक्त बाब म्हणून संबंधित क्षेत्रीय मुख्य अभियंता यांनी मंजूर करावा.

२. वरील १ प्रमाणे कार्यवाही करण्यात आल्यास संबंधित प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकात स्वामित्व शुल्काच्या बाबींचा समावेश करण्यात यावा.''

ठराव क्र. ३८/२१

''ठराव करण्यात येतो की, मौ. केगाव, ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील महामंडळाच्या मालकीच्या गट क्र. ५८ मधील १.८३ हेक्टर जागेपैकी १.१९ हेक्टर क्षेत्र कै. सुशीलाताई गायकवाड बहुउद्देशीय संस्थेस विशेष बाब म्हणून शैक्षणिक कार्यासाठी ३० वर्षे मुदतीच्या भाडेपट्टयाने खालील अटींच्या अधीन राहून देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

१. भाडेपट्टयाबाबत विहीत करारनामा करण्यात यावा.

२. जमिनीच्या प्रचलित बाजारभावाने होणाऱ्या मूल्याच्या २५ टक्के रकमेवर १५ टक्के प्रति वर्ष दराने भाडेपट्टा आकारण्यात यावा व या भाडेपट्टयामध्ये दरवर्षी १० टक्के वाढ करावी.

३. अशा प्रकारच्या प्रस्तावांवरील कार्यवाहीबाबत महामंडळाच्या विहित शर्ती व करारनामा यांचा अवलंब अशी मान्यता देताना करण्यात यावा.

४. मौ. केगांव ता. उत्तर सोलापूर येथील महामंडळाच्या ताब्यातील २५ हेक्टर क्षेत्र 'बांधा, वापरा व हस्तांतरित करा' या तत्वावर विकसित करण्यात यावे.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ठराव क्र. ३८/२२

''ठराव करण्यात येतो की,

१. वारणा प्रकल्पातून सध्याच्या नियोजनानुसार वंचित असलेले अंदाजे ६६८० हेक्टर क्षेत्र वारणा प्रकल्पाचे फेरनियोजन करुन वारणा प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात यावे.

२. वरील (१) नुसारच्या क्षेत्रास वारणा प्रकल्पातून सिंचनलाभ देण्यासाठी वारणा-कृष्णा जोड कालव्याच्या अधोमुखातून उपसा करुन पाणी देण्याचा प्रस्ताव करुन त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

३. वरील (२) प्रमाणे उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी वारणा कृष्णा जोड कालव्याच्या कामावरील स्थगिती उठविण्यात यावी व सदरचे काम हाती घेण्यात यावे.

४. वरील (२) प्रमाणे प्रस्तावित असलेल्या उपसा सिंचन योजनेसाठी अंदाजे रु. ६८ कोटींचे नव्याने दायित्व निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. वरील (२) मधील उपसा सिंचन योजनेस वाकुर्डे उपसा सिंचन योजना टप्पा-३ म्हणून संबोधण्यात यावे व वारणा प्रकल्पास केंद्रीय जल आयोगाची मान्यता घेतल्यानंतर वाकुर्डे टप्पा-१, २ व ३ या उपसा सिंचन योजनांचा समावेश सुधारित अहवालात करण्यात यावा.

६. वरील (२) मधील उपसा योजनेसाठी, "वारणा प्रकल्पाची पीकरचना बदलणे, सिंचनसाठीच्या कमी पाणी लागणाऱ्या विविध पर्यायी सिंचन प्रणालींचा अवलंब करणे" याद्वारे पाणी उपलब्ध होईल, असे नियोजन करण्यात यावे.''

ठराव क्र. ३८/२३

''ठराव करण्यात येतो की,

१. सांगली जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी ताकारी टप्पा-१ व २ चे पंप चालू करुन पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनामध्ये बलवडी, बळीराजा व वाझर को.प. बंधारे समाविष्ट करुन जून २००४ पर्यंत प्रायोगिक तत्वावर को.प. बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. बलवडी, बळीराजा व वाझर बंधाऱ्यांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून आगाऊ पाणीपट्टी वसूल करुनच पाणी देण्यात यावे.

३. वरील बंधारे भरण्यासाठी लागणारे २०१ दलघफू पाणी कोयना धरणातून उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास विनंती करण्यात यावी.

४. सदर बंधारे भरण्यासाठी होणारा खर्च टंचाई परिस्थितीसाठी प्राप्त होणाऱ्या आकस्मितता निधीतून उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करावा.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

ठराव क्र. ३८/२४

''ठराव करण्यात येतो की,

१. मौ. बलवडी, ता. खानापूर, जि. सांगली या वळवणीच्या बंधाऱ्याचे व कालव्याचे नुतनीकरणाचे काम कृष्णा प्रकल्पाचा भाग म्हणून करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. कृष्णा प्रकल्पाच्या सांगली जिल्ह्यातील किमी १०५ पुढील कालव्याच्या क्षेत्राची पीकरचना विरळ करुन या क्षेत्रास पाणी उपलब्ध करुन द्यावे.

२. वरील (१) मधील कामासाठी शासनाने जलसेवा सुधार वा इतर प्रकल्पांतर्गत आर्थिक तरतूद उपलब्ध करुन द्यावी, अशी विनंती शासनास करण्यात यावी.''

ठराव क्र. ३८/२५

''ठराव करण्यात येतो की,

१. नियामक मंडळाच्या ३७ व्या बैठकीत पारित केलेल्या ठराव क्र. ३७/५ मधील (अ) मध्ये नमूद केलेले कार्यकारी संचालक यांचे ५ टक्केपर्यंतचे निविदा अधिक्य मंजुरीचे अधिकार रु. १२५ लक्ष किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी लागू आहेत, असे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

२. महामंडळाच्या कार्यकक्षेतील अधिकाऱ्यांना सोबतच्या परिशिष्ट क्र.२ मध्ये जोडलेल्या नियमावलीनुसारचे अधिकार वापरण्यास नियामक मंडळाची परवानगी देण्यात येत आहे.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

**परिशिष्ट क्र. १**

## ताकारी उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील पोट कालव्यांची कामे सोनहिरा साखर कारखाना/ डोंगराई साखर कारखाना किंवा इतर संस्थांमार्फत करण्याबाबतच्या अटी व शर्ती

१. वितरिकांचे मातीकाम व बांधकाम संकल्पित काटछेद व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सक्षम स्तरावर मंजूर केलेल्या संरखेनुसार करणे बंधनकारक राहील. वितरिकेवर आवश्यक सर्व बांधकामे पूर्ण करावीत.

२. मातीकाम व बांधकामे महामंडळाने निर्देशित केलेल्या विनिर्देशांनुसार (Specifications) व्हावीत. कामाच्या गुणवत्तेवर महाराष्ट्र शासनाच्या गुण-नियंत्रण मंडळाचे नियंत्रण राहील. त्यासाठी आवश्यक ते सर्व सहाय्य साखर कारखान्याने त्यांना देणे बंधनकारक राहील. गुणनियंत्रणासंबंधीचे चाचणी निष्कर्ष व अभिलेखे ठेवणे आवश्यक राहील.

३. वितरिकांच्या कामांसाठी महामंडळ तांत्रिक मार्गदर्शन विनामूल्य देईल. सदर कामे महामंडळाच्या तांत्रिक सहाय्याने व देखरेखीखाली करणे आवश्यक आहे. पूर्ण करण्यात आलेल्या कामांची मोजमापे कारखान्याच्या प्रतिनिधी समक्ष महामंडळाकडून घेण्यात येतील व विनिर्दिशांमध्ये नमूद केलेल्या शर्तीनुसार झालेल्या कामाची किंमत ठरविण्यात येईल.

४. कारखान्याने ही कामे स्वतःच्या जबाबदारीवर व जोखमीवर करणे आवश्यक राहील. वितरिकांची बांधकामे व मातीकाम याकरिता आवश्यक असणारी जमीन संबंधित शेतकऱ्यांनी महामंडळास दानपत्राद्वारे कायदेशीर रित्या उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ही कार्यवाही कारखान्याने करावी. महामंडळ शक्य ते सहकार्य देईल. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचे ताब्यातील रस्त्याच्या ओलांड्याच्या कामाकरिता परवानगी मिळविणे व त्यासाठी आवश्यक शुल्क कारखान्यामार्फत भरणे आवश्यक राहील. यासाठी आवश्यक ते प्रमाणपत्र महामंडळाकडून देण्यात येईल.

५. वितरिकेवरील मुख्य व इतर दरवाजे (Outlet gates) पाटबंधारे खात्यांतर्गत यांत्रिकी संघटनेकडून करावे. यांत्रिकी संघटनेला निधी कारखान्याने उपलब्ध करुन द्यावा.

६. झालेल्या कामांसाठी पाटबंधारे विभागाच्या प्रचलित दरसूचीनुसार येणारी रक्कम तसेच कारखान्याने केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची (साखर कारखान्याच्या चार्टर्ड अकौंटंट यांनी प्रमाणित केलेली रक्कम) यापैकी कमी असलेली रक्कम देय राहील. महामंडळाकडे जेव्हा निधी उपलब्ध होईल तेव्हा ही रक्कम अदा केली जाईल. केलेल्या कामाच्या प्रलंबित देयकाच्या रक्कमेवर व्याज किंवा इतर मागणी देय राहणार नाही. वितरिकेची कामे विनिर्दिशांनुसार पूर्ण झाल्यानंतर सदर वितरिका देखभाल व दुरुस्ती तसेच सिंचन व्यवस्थापनासाठी लाभधारकांच्या पाणी वापर संस्थांकडे हस्तांतरित करण्यात यावीत.

७. विहित विनिर्दिशांनुसार काम होत नाही असे निदर्शनास आल्यास, तसेच गुणनियंत्रण विभागाचे कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर आक्षेप आल्यास काम तात्काळ बंद करण्यात येईल. यामुळे होणाऱ्या नुकसानीस साखर कारखाना जबाबदार राहील. सदरची कामे बारा महिन्यांच्या

**मा. मंत्री, पा (कृखो व कीपाविमं)**
**ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता**
**आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे**

**कार्यकारी संचालक,**
**म.कृ.खो.वि.म., पुणे**

कालावधीत पूर्ण करणे साखर कारखान्यावर बंधनकारक राहील. साखर कारखाना व महामंडळातील स्थानिक अधिकारी/ कर्मचारी यांचेमध्ये काम करत असताना कोणताही वाद निर्माण झाल्यास अधीक्षक अभियंता, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली यांचा निर्णय अंतिम राहील.

८. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर ती पाणीवापर संस्थांकडे हस्तांतरीत होण्यापर्यंतच्या कालावधीत देखभाल व दुरुस्ती करणे ही जबाबदारी साखर कारखान्याची राहील. या कालावधीत शासन नियमानुसार देय होणारी पाणीपट्टी साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांकडून वसूल करुन महामंडळाकडे भरण्याची जबाबदारी कारखान्याची राहील.

९. कालव्यातून वितरिकेमध्ये घनमापन पध्दतीने पाणी सोडले जाईल व पाणीपट्टी आकारणी घनमापन पध्दतीने करण्यात येईल. वितरिकेमधून सोडले जाणारे पाणी हे कालव्याच्या सिंचन नियोजनाप्रमाणे सोडण्यात येईल. या नियोजनाबाहेर कारखान्याने मागणी केल्यास तसे पाणी सोडले जाणार नाही.

१०.नियामक मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने कारखान्याने महामंडळाशी करारपत्र करावे लागेल. वरील अटींचा भंग झाल्यास, झालेल्या कामासह अंशतः अथवा सर्व सिंचन व्यवस्था असेल तशी ताब्यात घेण्याचा हक्क महामंडळास राहील.

११.इतर साखर कारखान्यांनी/ संस्थांनी वितरिकांची कामे करण्याची तयारी दर्शविल्यास त्यासाठी देखील वरील अटी लागू राहतील.

**मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)**
**ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता**
**आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे**

**कार्यकारी संचालक,**
**म.कृ.खो.वि.म., पुणे**

परिशिष्ट क्र. २

## निविदा मंजुरीचे अधिकार

| अ. क्र. | अधिकाराचे स्वरुप | प्रदान करण्यात आलेले अधिकार | | |
|---|---|---|---|---|
| | | कार्यकारी अभियंता | अधीक्षक अभियंता | मुख्य अभियंता |
| १ (अ) | निविदा मंजूर करण्याचे अधिकार | रु. २५,००,००० | रु. १,२५,००,००० | पूर्ण अधिकार |
| १ (ब) | अधिक्यास मंजुरी देण्याचे अधिकार (निविदेतील अंदाजपत्रकाच्या चालू दरसूचीच्या आधारे येणाऱ्या किंमतीवर) | निरंक | ५ टक्के रु. २५ लक्ष किंमतीपर्यंतच्या निविदांसाठी | ५ टक्के रु.१२५ लक्ष किंमतीपर्यंतच्या निविदांसाठी |

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं)
ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता
आणि अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे